**ई-मेल द्वारे**

**संदर्भ :** विधि व न्याय विभाग शासन निर्णय क्र.जगन्या १४१९/५/प्र.क्र.४/का-नऊ, दि.०४/०३/२०२०
**संदर्भ :** सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७/१२/२०१६

# जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर

**-: परिपत्रक :-**

**क्रमांक - बी.०४/आस्था.०३ / १३९/२०२४**

कार्यालयाचा दूरध्वनी क्र. ०२४१-२३५११११ ई मेल आय डी - **mahahmdc@nic.in**

---

१) अहमदनगर जिल्हा न्यायालयाचे आस्थापनेवरील मुख्यालयातील अतिरिक्त सह जिल्हा न्यायाधीश आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश, अहमदनगर (**विशेष जलदगती न्यायालय**) यांचे न्यायालयाकरीता खालील नमुद कर्मचारी वर्ग कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या पदांवर सेवानिवृत्त कर्मचा-यांमधून भरावयाचा आहे.

| अ.क्र. | पदनाम | विशेष जलद गती न्यायालयाकरीता पदसंख्या |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | लघुलेखक (उच्च श्रेणी/श्रेणी-२) | १ |
| २ | अधिक्षक | १ |
| ३ | वरिष्ठ लिपिक | १ |
| ४ | कनिष्ठ लिपिक | २ |
| ५ | शिपाई | २ |

२) उपरोक्त रकाना क्र.३ मध्ये नमुद पदे ही दि.१७/०६/२०२५ रोजीपावेतो उपरोक्त नमुद शासन निर्णयानूसार कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात येणार आहेत.

३) तरी, केवळ नियतवयोमानाने सेवानिवृत्त झालेल्या इच्छुक कर्मचा-यांनी यासोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज या कार्यालयास **दिनांक २७/०९/२०२४ रोजी पर्यंत** पाठवावेत.

४) स्वेच्छानिवृत्त घेतलेल्या कर्मचा-यांनी व तसेच विभागीय/खातेनिहाय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित आहे किंवा अशा चौकशीमध्ये शिक्षा झालेल्या कर्मचा-यांनी अर्ज सादर करु नयेत.

५) अहमदनगर जिल्हयातील सर्व कार्यालय प्रमुख यांनी प्रस्तुतचे परिपत्रक कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावे तसेच कार्यालयात कार्यरत असलेल्या कर्मचा-यांचे सदरचे परिपत्रक निदर्शनास आणावे व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

६) जिल्हा प्रणाली अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांनी प्रस्तुतचे परिपत्रक जिल्हा न्यायालय, अहमदनगर कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करुन तसा अहवाल सादर करावा.

७) सहायक अधिक्षक, लेखा व वित्त, जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांनी प्रस्तुतचे परिपत्रक बेलिफामार्फत जिल्हा न्यायालय, अहमदनगर ईमारतीमधील प्रत्येक मजल्यावर असलेल्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करुन तसा अहवाल सादर करावा.

13/9/2024

जिल्हा न्यायालय, अहमदनगर, ))
दिनांक : १३ /०९/२०२४. ))

( सुधाकर वें. यार्लगड्डा )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर

**क्रमांक : बी.०४/आस्था.०३/ १३९ /२०२४**

**प्रत माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषीत :-**

१) अहमदनगर जिल्हयातील सर्व प्रमुख कार्यालय.

२) सर्व शाखा प्रमुख, जिल्हा न्यायालय, अहमदनगर.

३) कार्यालयीन संचिका/नोटीस बोर्ड.

( सुधाकर वें. यार्लगड्डा )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
अहमदनगर

जिल्हा न्यायालय, अहमदनगर, ))
दिनांक : १३/०९/२०२४. ))

संदर्भ - जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर परिपत्रक क्रमांक बी.०४/आस्था.०३/१३९/२०२४, दिनांक १३/०९/२०२४.

## अर्जाचा नमुना

----------------- या पदासाठी अर्ज.

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे पुर्ण नाव | |
| २ | पत्ता, मोबाईल नंबर | |
| ३ | सेवानिवृत्तीच्या वेळी कार्यरत असलेल्या पदाचे नाव. | |
| ४ | सेवानिवृत्तीच्या वेळी कार्यरत असलेल्या पदावर नेमणुकीचा दिनांक | |
| ५ | करार पध्दतीने इच्छुक असलेल्या पदाचे नाव | |
| ६ | जन्म दिनांक | |
| ७ | नियत वयोमानाने सेवानिवृत्तीचा दिनांक | |
| ८ | सेवानिवृत्तीच्या वेळी कार्यरत असलेल्या कार्यालयाचे नाव. | |

दिनांक : /०९/२०२४.

सेवानिवृत्त कर्मचा-याची स्वाक्षरी